आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मोरवा विमानतळ विस्तार व आधुनिकीकरणाला गती

आ. मुनगंटीवार यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद; मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे त्वरित कार्यवाहीचे निर्देश

मुख्यमंत्र्यानी दिले महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संचालकाला कार्यवाहीचे निर्देश

चंद्रपूर, दि.१६ - चंद्रपूर जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. मोरवा विमानतळाच्या विस्तार व आधुनिकीकरणासाठी आ. मुनगंटीवार यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी संबंधित प्रस्तावाची तातडीने दखल घेत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या सकारात्मक निर्णयामुळे मोरवा विमानतळाच्या विस्तार व आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळणार असून, चंद्रपूरच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला नवे बळ प्राप्त होणार आहे.

मोरवा विमानतळाच्या विस्तार, आधुनिकीकरण तसेच धावपट्टीच्या वाढीव कामांना गती मिळावी यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. चंद्रपूर जिल्हयाच्या औद्योगिक, व्यावसायिक आणि पर्यटन विकासासाठी विमानतळाचा विस्तार अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आ. मुनगंटीवार यांनी मांडलेल्या मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठीच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी तातडीने पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

चंद्रपूर जिल्हा हा खनिज संपत्ती, ऊर्जा उत्पादन, सिमेंट उद्योग, पोलाद उद्योग आणि वनसंपदेच्या दृष्टीने राज्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे. तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामुळे देश-विदेशातील पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र म्हणून चंद्रपूरची ओळख निर्माण झाली आहे. मात्र, वाढत्या औद्योगिक आणि पर्यटनविषयक गरजांच्या तुलनेत येथील विमानतळाची सुविधा अपुरी असल्याने विकासाला मर्यादा येत असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

सध्या चंद्रपूर विमानतळाची धावपट्टी सुमारे ९०० मीटर लांबीची असून छोट्या प्रवासी विमानांच्या उड्डाणासाठी ती अपुरी आहे. भविष्यात नियमित हवाई सेवा सुरू करण्यासाठी धावपट्टीचा विस्तार, डीजीसीए मानकांनुसार सुविधा उभारणे आणि अन्य पायाभूत विकासकामे करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे चंद्रपूर विमानतळ विकासाचा मार्ग अधिक सुकर झाला असून, या प्रकल्पामुळे जिल्ह्यात उद्योग, गुंतवणूक, पर्यटन आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासासाठी मोरवा विमानतळ विस्ताराचा विषय प्राधान्याने मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न सातत्याने सुरू राहील, अशी ग्वाहीही आ. मुनगंटीवार यांनी दिली.

(10)

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 4637 / मुन/२८

दिनांक : 11.06.2026

प्रति,

मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणविस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई -32

V.C. MD
कार्यवाही करावी

वंदे मातरम् !

विषय : चंद्रपूर येथील मोरवा विमानतळाचे विस्तारीकरण व आधुनिकीकरण करण्याकरीता दिनांक 16 किंवा 17 जुन 2026 रोजी बैठकीचे आयोजन करण्याबाबत.

संदर्भ : माझे आपणास सादर पत्र दिनांक 19.11.2025, 1.12.2025

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्याच्या खनिज साधन संपत्तीच्या स्वरूपात या राज्याच्या विकासाकरीता आवश्यक महसुलामध्ये सिंहाचा वाटा आहे. या जिल्ह्यामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक स्थळांमध्ये नामांकित ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, पौराणिक वैभव प्राप्त असलेले माता महाकालीचे मंदिर आहे. या जिल्ह्यातील उपलब्ध कोळसा साठा व इतर खनिज साधन संपत्तीच्या स्वरूपात मुबलक उपलब्ध असलेला कच्चा माल यावर अवलंबुन असलेले उद्योग राज्याच्या विकासात मोलाचे योगदान देत आहे. यावर आधारीत आशियातील मोठे औष्णिक विद्युत केंद्र, सिमेंट निर्माण उद्योग, लोह खनिज (सुरजागड) उद्योग या जिल्ह्यात कार्यरत आहे.

या जिल्ह्यातील मोरवा विमानतळाचे आवश्यक आधुनिकीकरण व विस्तारीकरण आजतागायत झालेले नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता या विमानतळावर औद्योगिक दृष्टीकोणातुन मोठे माल वाहतुक व प्रवासी विमान लॅंडींग करण्याकरीता उपलब्ध विमानाच्या धावपट्टीची लांबी वाढविणे, ए.टी.सी.सी. टॉवर बांधकाम करणे व इतर अनुषंगीक सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनस्तरावर बैठकीचे आयोजन करणे आवश्यक आहे. सद्यास्थितीत मोरवा येथील धावपट्टीची लांबी केवळ 900 मिटर असुन, कमीत कमी चार्टड फ्लाईट सुरू करण्यासाठी धावपट्टीची लांबी वाढविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपल्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित अधिकाऱ्यांसह दिनांक 16 किंवा 17 जुन 2026 रोजी बैठकीचे आयोजन करण्याबाबतच्या योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

बैठकीची निश्चिती मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :
1 मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई
2 मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
3 मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1, चंद्रपूर

!! वृक्ष लावा, वृक्ष जगवा !! पत्ता : 'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र. 07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

Scanned with OKEN Scanner